ATT

CATT060802

**जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचा-यांनी कार्यालयीन वेळेवर उपस्थित राहण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - सकीर्ण -२००८/प्र.क्र. २१९/आस्था-९
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दिनांक २४ जून, २००८.

**परिपत्रक :-** राज्यातील काही सेवाभावी व सामाजिक संघटनांच्या पदाधिका-यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, राज्यातील क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नाही तसेच, बरेच कर्मचारी त्यांच्या मुख्यालयी न राहता रोज येणे-जाणे करतात त्यामुळे कार्यालयीन कामासाठी येणा-या नागरीकांना विनाकारण त्रास सोसावा लागतो. या बाबीची शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तेव्हा अशा कार्यालयात उशिरा येणा-या अथवा मुख्यालयी हजर न राहण्याच्या प्रवृत्तीला आळा बसण्याच्या दृष्टीने पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

१) जिल्हा परिषदेतील आस्थापना विषयक कामे हाताळणा-या वरिष्ठ अधिका-यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालय व पंचायत समित्या यांना अचानक भेटी देवून उशिरा येणा-या अधिका-यांची यादी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावी.

२) सातत्याने कार्यालयात उशिरा येणा-या कर्मचा-यांविरुध्द कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

३) जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील आणि पंचायत समित्यांमधील उशिरा येणा-या कर्मचा-यांची नांवे व अशा कर्मचा-यांविरुध्द करण्यात आलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईचा त्रैमासिक अहवाल संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठवावा.

४) संबंधित विभागातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले त्रैमासिक अहवालाची तपासणी करुन कार्यालयात उशिरा येणाच्या प्रवृत्तीला आळा बसण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्तांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

५) विभागीय आयुक्त यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या त्रैमासिक अहवालाच्या अनुषंगाने कार्यालयात उशिरा येणा-या कर्मचा-यांच्या प्रवृत्तीला आळा बसण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल आपल्या अभिप्रायांसह शासनाकडे पाठवावा.

३. शासनाच्या उपरोक्त सूचनाचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

हा शासन आदेश संगणक संकेतांक क्रमांक २००८०६१३१११२८४१००१ अन्वये www.maharashtra gov.in या शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येत आहे.

23/7/08
EST-V

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( प्रकाश हिर्लेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
मुख्य सचिव
सचिव (ग्राम विकास व पंचायत राज ) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त, (सर्व )